NUTA BULLETIN
FORTNIGHTLY JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHER'S ASSOCIATION
Regd. No. ATI 263 *Licensed to post without prepayment No. ATI 10
Year : 21 15th May,1996 No. : 3

*महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलावरील सत्यशोधन समितीच्या अहवालानुसार अनुशेष निश्चित झाल्यानंतरसुद्धा पुढच्या १०-१२ वर्षात राजकीय लूटमारीचे स्वरूप यावे एवढ्या मोठ्या प्रमाणात विकसित जिल्ह्यांनी आर्थिक तरतुदींचे तूप आपआपल्या पोळ्यांवर ओढून घेतले. तुपाशी खाणाऱ्यांना उपाशी माणसांचे काय ? जलसिंचन, उद्योग या क्षेत्रात विदर्भाचे तूपही गेले, तेलही गेले, पण निदान पाणी? त्या नागरी पाणी पुरवठ्याच्या अनुशेषानेही आमची पार कंबर मोडली. दांडेकर समितीच्या उपरोक्त अहवालातील सत्यशोधनाचा आधार घेऊन त्यातून बोध घ्यावयाचा झाल्यास ... महाराष्ट्रातील नागरी पाणी पुरवठ्याचा सर्वात जास्त अनुशेष असलेला प्रदेश म्हणजे विदर्भ ! विदर्भाच्या या व्यथेच्या निर्मूलनाबाबत घाटंजी सारख्या लहान शहराच्यासंदर्भात विधानपरिषदेत करण्यात आलेला हा अल्पसा प्रयत्न.*

# घाटंजी शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना

***प्रा.बी.टी.देशमुख,*** *विधानपरिषद सदस्य.*

३ नोव्हेंबर १९९२ रोजी रात्री आठ वाजता आर्णी येथील सभा आटोपून आम्ही रात्री उशिरा घाटंजी येथे मुक्कामाला आलो. विधान परिषदेच्या निवडणुकीच्या प्रचार दौऱ्याचे निमित्त होते. सर्वश्री डॉ. शरद कळणावत, प्राचार्य एम.एम. महल्ले, प्रा.एस.टी.सांगळे, श्री. पी.के.टोंगे हे या प्रचार दौऱ्यामध्ये सोबतीला होते. दुसऱ्या दिवशी ४ तारखेला सकाळी ७.३० वाजता पहिली प्रचाराची सभा घाटंजी येथे होती व त्यामुळे रात्रीचा मुक्काम घाटंजी येथेच करावा असे ठरले. सकाळी सहा वाजता उठून सभेला जाण्यासाठी तयारी करावी तर ज्या विश्रामगृहावर आम्ही मुक्कामाला होतो तेथे कोणत्याही कक्षामध्ये नळाला पाणी नाही असे दिसून आले. कारण म्हणून चौकशी केली असता विश्राम गृहाचा हा भाग उंचावर असल्यामुळे या भागात पाणी चढत नाही असे सांगण्यात आले. विश्रामगृह इमारतीच्या मुख्य दारापासून परिसराच्या फाटकापर्यंतच्या रस्त्यावर उजव्या बाजूला मैदानात असलेल्या एका लहानशा नळाला बारीक धार पाणी हळुहळू येत होते, त्याचा वापर करून आम्ही कसेतरी सभेसाठी तयार झालो. पाण्याच्या या दुर्भिक्ष्याबाबत अधिक चौकशी केली असता असे कळले की, घाटंजी शहराची मूळ वस्ती वाघाडी नदीच्या उजव्या किनाऱ्यावर असून डाव्या बाजूला घाटी ही नवीन वस्ती गेल्या काही वर्षामध्ये स्थापीत झाली आहे. विश्रामगृह व **अनेक नवीन शासकीय कार्यालये या घाटी भागामध्येच असून हा भाग उंचावर असल्यामुळे मूळ योजनेतून या भागाला पुरेशा दाबाने पाणी पुरवठा होत नाही.**

२. दौरा आटोपून घरी आल्यानंतर दांडेकर समितीच्या रिपोर्टनुसारची आकडेवारी पाहिली तर या शहराचा दररोजचा अनुशेष १५ लक्ष लिटर्स एवढा निश्चित करण्यात आल्याचे दिसून आले. सत्यशोधन समितीच्या या अहवालानुसार महाराष्ट्रामध्ये नागरी पाणी पुरवठ्याचा सर्वात जास्त अनुशेष असलेला प्रदेश (Region) म्हणजे विदर्भ. २७३ दशलक्ष लिटर्स दरदिवशी म्हणजे सर्वात जास्त अनुशेष असलेल्या या प्रदेशातील सर्वात जास्त (६१ दशलक्ष लिटर्स दरदिवशीचा) अनुशेष असलेला क्रमांक एकचा जिल्हा म्हणजे अमरावती, त्यातील महत्तम अनुशेष असलेले क्रमांक एकचे शहर (३२ दशलक्ष लिटर्स दरदिवशी) म्हणजे अमरावती. विदर्भातील नागरी पाणी पुरवठ्याचा दरदिवशीचा ५६ दशलक्ष लिटर्स अनुशेष निश्चित झालेला क्रमांक दोन चा जिल्हा

# घाटंजी शहराचा खुप दिवसांपासून रेंगाळलेला वाढीव पाणी पुरवठा प्रकल्प एकदाचा पूर्ण झाला आणि त्या योगे... घाटी परिसरातील रहिवाशांना दरवर्षी भेडसावणारा कडक उन्हाळा यंदा थोडासा सुसह्य झाला !

म्हणजे अकोला व क्रमांक दोनचे शहर सुद्धा अकोलाच. (दरदिवशी ३० दशलक्ष लिटर्स) यवतमाळ जिल्ह्याचा नागरी पाणी पुरवठ्याचा अनुशेष दांडेकर समितीने २६ दशलक्ष लिटर्स दरदिवशी दाखविला असून त्यामध्ये एकट्या यवतमाळ शहराचा अनुशेष ११.५० दशलक्ष लिटर्स दरदिवशी एवढा आहे. **घाटंजी सारख्या १५-१६ हजार लोकसंख्या असलेल्या शहराचा सुद्धा १५ लक्ष लिटर्स दरदिवशी एवढा अनुशेष निश्चित झालेला आहे, हे पाहून आश्चर्य वाटले.** विदर्भातील बहुतेक शहरे, अमरावती महसूल विभागाच्या अमरावती, अकोला, बुलढाणा जिल्ह्यातील सर्वच शहरे व यवतमाळ जिल्ह्यातील सात शहरे नागरी पाणी पुरवठ्याच्या अनुशेषात आहेत.

३. अनुशेषांत असलेल्या शहरांना दरवर्षी पाण्याचा तुटवडा जाणवतो व विशेषतः उन्हाळ्यात तर ही रखरख मोठ्या प्रमाणात वाढते, परिणामी लोकांच्या असंतोषाला तोंड देतांना तातडीच्या पाणी पुरवठा योजना शासनाला घ्याव्या लागतात. अनुशेष नसलेल्या शहरांना अशा तातडीच्या पाणी पुरवठा योजनांची गरजच पडत नाही ही गोष्ट उघड आहे. १९८६ ते १९९२ या सहा वर्षांच्या कालखंडात ५ तातडीच्या पाणीपुरवठा योजना घाटंजी शहरासाठी घ्याव्या लागल्या, त्याचे मुख्य कारण म्हणजे मुळ योजनेतुन उपलब्ध होणारे तुटपुंजे पाणी हेच होय. **(१)** १९८६ च्या उन्हाळ्याकरिता सँडबॅग बंधाऱ्याचे काम पूर्ण करण्याची तातडीची योजना मंडळातर्फे राबविण्यात आली. ११.२.८६ रोजी तातडीच्या योजनेला मान्यता देण्यात आली. ०.२८ लक्ष रुपये किमतीच्या या योजनेवर प्रत्यक्ष खर्च ०.२५ लक्ष रुपये झाला **(२)** १९८७ च्या उन्हाळ्यासाठी १४.१.८७ रोजी २.०० लक्ष रुपये किमतीच्या तातडीच्या योजनेला मान्यता देण्यात आली. प्रत्यक्ष खर्च १.२८ लक्ष रुपये एवढा

### ऋणनिर्देश

यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी या लहानशा शहराच्या लोकांची पाण्याची तहान भागविण्यासाठीही पुरेसे पाणी उपलब्ध होऊ नये असा या शहराचा नागरी पाणी पुरवठा अनुशेष ! आणि या समस्येचे सांगोपांग विश्लेषण करणारा नुटा बुलेटीनचा हा विशेषांक !!

हा विशेषांक प्रकाशित करण्यासाठी आवश्यक असलेले बळ उभारण्यात ज्यांनी सक्रिय सहकार्य दिले त्या .... डॉ. वसंतराव बोंडे, माजी आमदार, हिंगणघाट, श्री. पी.एस.ठाकरे, चार्टर्ड अकाउन्टन्ट, नागपूर आणि श्री. सुरेशबाबू लोणकर व श्री. जितेंद्र ठाकरे जिल्हा परिषद सदस्यव्दय, यवतमाळ तसेच श्री. राजा राऊत आणि श्री. बी.के. धर्मे, यवतमाळ सोबतच घाटंजीचे सर्वश्री बी.एच. नाईनवार, गोपाल अटारा, पी.एल.कोल्हे तसेच डॉ. अरविंद भुरे आणि प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे ज्यांचे सहकार्य आम्हाला मिळाले त्या सर्वांचे आम्ही ऋणी आहोत.

हस्ते परहस्ते, प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे विधानपरिषदेतील या चर्चा कानावर आल्यानंतर या अंकाच्या प्रकाशनासाठी आग्रहपूर्वक प्रयत्न करणाऱ्या नुटाच्या घाटंजीस्थित संघटक समितीचे अध्यक्ष प्रा. के.एम.वाघ व प्रा. एच.डी.पांडे, प्रा.एस.एल. चुनारकर, प्रा.टी.वाय. खटी, प्रा.आर.जी.डंभारे व श्री. एस.एम.विठाळकर (ग्रंथपाल) ह्या विशेषांक प्रकाशन समितीच्या सदस्यांचा ऋणनिर्देश करणे त्यांनाहि आवडणार नाही पण त्यांच्या धडपडीचा निर्देश तर केलाच पाहिजे.

**-ए.जी.सोमवंशी,**
संपादक, नुटा बुलेटीन

### *घाटंजी नागरी पाणी पुरवठा योजना*
### *अ. सर्व साधारण माहिती*

१. शहराचे नाव : घाटंजी
२. नगरपालिकेचे वर्गीकरण : 'क' वर्ग
३. अनुशेषाबाबत : बॅकलॉग
४. लोकसंख्या : १९९१ - १५७८५, सध्याची १६०००
५. अस्तित्वातील पाणी पुरवठा केंद्राचा उद्भव व क्षमता.

**अ)** उद्भव व क्षमताः वाघाडी नदीवर जॅकवेल (इनटेक वेल, कनेक्टींग पाईपसहित)

**ब)** केंद्राची क्षमता : १.९२ द.ल.लि.

६. पाणी पुरवठा योजना चालविणारी संस्था : नगरपालिका घाटंजी
७. ग्रामपंचायतीचे रूपांतर नगरपरिषदेमध्ये : मूळ योजना नगरपालिकेचीच योजना म्हणून राबविण्यात आली.
८. पाणी पुरवठ्याचे प्रमाण.
१) नेहमीचे : ७० लि. प्रति माणशी प्रति दिवशी
२) उन्हाळ्यात : ७० लि. प्रति माणशी प्रति दिवशी
३) मापदंडाप्रमाणे : ७० लि. प्रति माणशी प्रति दिवशी
९. विशेष माहिती :

घाटंजी शहर वाघाडी नदीमुळे दोन भागामध्ये विभागल्या गेले आहे. शहरातील उंच भागाकडे जी की 'घाटी' नावाने संबोधिल्या जाते नेहमी टंचाई भासते. या विभागाला पुरेशा दाबाने व पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही.

तसेच शहराची वाढ या भागातच जास्त होत असल्यामुळे व या भागातच नवीन कार्यालये सुद्धा निर्माण होत आहेत त्यामुळे टंचाईवर मात करण्याच्या दृष्टीने मूळ उद्भवात बदल न करता शासनाच्या नगर विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. १०९०/१३८४ /सीआर/१५२/नवि३० दिनांक २०.३.९२ अन्वये घाटंजी पूरक पाणी पुरवठा योजनेस मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेची किंमत १९ लाख रु. आहे.

प्रस्तावाची सविस्तर माहिती (क) प्रगतीपथावरील योजना यामध्ये देण्यात आली आहे.

१०. आरक्षण : सद्य:स्थितीमध्ये या शहराला आरक्षणाची आवश्यकता नाही.
११. अनुशेषाबाबत : १. दांडेकर समितीने सन १९८२ च्या लोकसंख्येच्या आधारावर ठरविलेला अनुशेष : १.५० द.ल.लि.द.दि.

घाटंजी शहर पाणी पुरवठा योजना यशस्वी होण्यासाठी विधानपरिषद पातळीवर झालेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा सर्वंकष आढावा घेणाऱ्या तसेच या शहराच्या नागरी पाणी पुरवठा अनुशेषाची अभ्यासपूर्ण दखल घेणाऱ्या आपल्या या विशेषांकाला ...
या शहरासमोरील जिव्हाळ्याचे व ज्वलंत प्रश्न सोडविण्यात सदैव कटिबद्ध असलेल्या ...

***नगर परिषद, घाटंजी कडून हार्दिक शुभेच्छा !***

**या निमित्ताने घाटंजीकर जनतेला नम्र सूचना :-** (१) मालमत्ता व नगर परिषदेचे इतर संपूर्ण कर यांचा वेळेवर भरणा करून विकास कार्यात सहकार्य करा. (२) पाण्याचा अपव्यय टाळा. (३) पिण्याचे पाणी भरून होताच नळाची तोटी बंद करण्याची दक्षता घ्यावी. (४) पिण्याकरिता प्रक्रिया केलेले व शुद्धीकरण केलेले पाणी रस्त्यावर अथवा इतर कामासाठी वापरू नये ही विनंती.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ***शाम बेलोरकर*** | ***सौ.सुमनताई धनरे*** | ***ओमप्रकाश डहाके*** | ***जी.एन.वाहूरवाघ*** | ***समस्त सदस्य गण*** |
| *अध्यक्ष* | *उपाध्यक्ष* | *सभापती, पाणी पुरवठा* | *मुख्याधिकारी* | *नगर परिषद, घाटंजी* |

# वाढीव पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यामुळे एका महत्त्वाच्या विकास क्षेत्रातील लहानशा अनुशेषाचे निर्मूलन झाले याचा मनस्वी आनंद व घाटंजीकरीता अत्यंत समाधानाची बाब !

झाला. इनटेक वेल जवळील गाळ काढणे, शुद्ध पाणी (१० अश्वशक्तीचा पंप) व अशुद्ध पाणी (१५ अश्वशक्तीचा पंप) पंप बसविणे इत्यादी कामे या योजनेत समाविष्ट होती व योजना मंडळातर्फे राबविण्यात आली. (३) १९९० च्या उन्हाळ्याकरिता ०.५८ लक्ष रुपये किंमतीची तातडीची योजना घ्यावी लागली व ०.५८ लक्ष रुपयेच प्रत्यक्ष खर्च झाला. २ विंधन विहिरीचे काम या योजनेत घेण्यात आले व ती नगरपरिषदेतर्फे राबविण्यात आली. (४) १९९२ च्या उन्हाळ्याकरिता १२.२.९२ रोजी २.९० लक्ष रुपये किमतीच्या तातडीच्या योजनेला मान्यता देण्यात

### *घाटंजी नागरी पाणी पुरवठा योजना*
### *ब. राबविण्यात आलेली कायम स्वरूपी मूळ पाणी पुरवठा योजना :*

१. प्रशासकीय मान्यता : नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. एमडब्ल्युएस/२७७३- ३१६४५ दिनांक १७.९.७३
२. तांत्रिक मंजुरी : मुख्य अभियंता (पी.एच.) शासन आय अँड पी विभाग निर्णय क्र. डब्ल्यूएसएम/२७७१/१५४३००, दि. २९.९.७३
३. योजनेची किंमत : रु. २६२८००/- ढोबळ
४. पाणी पुरवठ्याचा दर : ७० लि. माणशी प्रती दिवशी
५. संकल्पित लोकसंख्या : १८००० वर्ष २००१
६. योजना सुरू झाल्याचा दिनांक : १०.४.७४
७. योजनेतील उपकामे :

**१.** वाघाडी नदीच्या काठी जॅकवेल, इनटेक वेल, कनेक्टींग पाईप : १. जॅकवेल पाच मी. व्यास व १३.६० मी. खोल पंप हाऊससह. २. इनटेक वेल वाघाडी नदीच्या पात्रात २.० मी. व्यासाची व ६.६० मी. खोल. ३. कनेक्टींग पाईप ३०० मी.मी. व्यासाचे सी.आय.एल.ए. वर्गाचे पाईप १८.४० मी. लांब.

**२.** अशुद्ध पाणी पंपींग मशनरी : १० अश्वशक्तीचे डीप वेल टर्बाइन पंप २ नग दर तासी ८- हजार लि. पाणी २२ मी. उंचीवर फेकण्याची क्षमता असलेले आहेत

**३.** अशुद्ध पाणी उर्ध्वनलिका २५० मी.मी. व्यासाची ९२ मी. लांब

**४.** जलशुद्धीकरण केंद्र क्षमता १.९२ द.ल.लि.

**५.** शुद्ध पाणी पुरवठा करणारे पंप १० अश्वशक्तीचे २ नग.

**६.** शुद्ध पाणी उर्ध्वनलिका सी.आय.क्लास एल.ए. २२५ मी. मी. व्यास १२०२ मी. लांब

**७.** पाण्याची उंच टाकी क्षमता ५ लक्ष लि. (आर.सी.सी.)

**८.** वितरण नलिका सी.आय.क्लास एल.ए. ३०० मी.मी. ते ८० मी. मी. १२५९७ मी.

**९.** किरकोळ कामे

८. सुधारित योजना : आवश्यकता पडली नाही.
९. योजना पूर्ण झाल्याचा दिनांक : ३१.७.१९७८
१०. योजना हस्तांतरचा दिनांक : १.९.७८

आली प्रत्यक्ष खर्च २.९० लक्ष रुपये एवढा झाला. १५ विंधन विहिरीचे काम या योजनेत घेण्यात आले व ती नगरपरिषदेतर्फे राबविण्यात आली. (५) १९९२ च्या उन्हाळ्याकरिता २५.३.९२ रोजी ४.९५ लक्ष रुपये किमतीच्या तातडीच्या योजनेला मान्यता देण्यात आली प्रत्यक्ष खर्च ३.४० लक्ष रुपये एवढा झाला. डोहातील पाणी जॅकवेलजवळ पंपाव्दारे आणणे, विद्युत पंप बसविणे, गावात ४ विंधन विहिरी घेणे, इत्यादी कामे या योजनेत घेण्यात आली व ती नगरपरिषदेतर्फे राबविण्यात आली. १५-२० लाख रुपयामध्ये जेथे कायम स्वरूपी वाढीव पाणी पुरवठा योजना बांधली जावू शकते तेथे १९८६ ते १९९२ या सहा वर्षात आठ ते दहा लाख रुपये तातडीच्या पाणी पुरवठा योजनेवर या शहरासाठी खर्च करावा लागला.

४. सन १९९३ या वर्षामध्ये अमरावती शहर वर्षसहा महिन्यात पूर्णपणे या अनुशेषातून बाहेर पडण्याच्या तयारीत असतांना, अकोला शहराने सुद्धा या अनुशेषातून बाहेर पडण्यासाठी कंबर कसलेली होती. १९९३ या वर्षात निरनिराळ्या शासकीय प्रकाशनातून माहिती मिळविली तेव्हा असे लक्षात आले की, घाटंजी या शहराची मूळ योजना १९७३ सालची असून २ लाख ६२ हजार रुपये एवढ्या किमतीला ती त्यावेळी बांधलेली होती. पुढे लोकसंख्येच्या वाढीबरोबर या योजनेतून मिळणारे पाणी कमी पडायला लागले. विशेषतः वाघाडी नदीच्या डाव्या बाजूला घाटी या नावाने जी वस्ती वाढत गेली तो भाग उंचावर असल्यामुळे

### *घाटंजी नागरी पाणी पुरवठा योजना*
### *ई. टंचाई काळात घेण्यात आलेल्या उपाय योजनांचा तपशील*

*अ.नं. वर्ष (मंजुरीचा दिनांक) योजनेची किंमत (योजनेवरील खर्च) प्रस्तावित कामे व स्थिती*

१. १९८६ च्या उन्हाळ्याकरिता (११.२.८६) ०.२८ लक्ष (०.२५ लक्ष) सॅंडबॅग बंधारा काम पूर्ण मंडळातर्फे राबविण्यात आली.

२. १९८७ च्या उन्हाळ्याकरिता (१४.१.८७) २.०० लक्ष (१.२८ लक्ष) इनटेक वेल जवळील गाळ काढणे, शुद्ध पाणी (१० अश्वशक्तीचा पंप) व अशुद्ध पाणी (१५ अश्वशक्तीचा पंप) पंप बसविणे मंडळातर्फे राबविण्यात आली.

३. १९९० च्या उन्हाळ्याकरिता ०.५८ लक्ष (०.५८ लक्ष) २ विंधन विहिरी काम पूर्ण न.प.तर्फे राबविण्यात आली.

४. १९९२ च्या उन्हाळ्याकरिता (१२.२.९२) २.९० लक्ष (२.९० लक्ष) १५ विंधन विहिरी काम पूर्ण न.प.तर्फे राबविण्यात आली.

५. १९९२ च्या उन्हाळ्याकरिता (२५.३.९२) ४.९५ लक्ष (३.४० लक्ष) १. डोहातील पाणी जॅकवेलजवळ आणणे पंपाव्दारे २. विद्युत पंप बसविणे ३. गावात ४ विंधन विहिरी, प्रस्ताव न.प.तर्फे राबविण्यात आला.

घाटी परिसरातील पाण्याच्या टाकीचे अद्यावत बांधकाम पूर्ण करणाऱ्या ... आता पर्यंत विविध पाण्याच्या टाकींचे बांधकाम पूर्णत्वास नेलेल्या ... आणि भविष्यातही अधिक प्रभावीपणे आपल्या आधुनिक यंत्रणेसह अशा प्रकारची कामे पार पाडण्यास सिद्ध असलेली आमची अग्रगण्य कंपनी ...
**ए.जी.जगताप कॉन्ट्रॅक्टर्स, यवतमाळ**
(व्दारा सुमीत एस.टी.डी.पी.सी.ओ., आर्णी रोड)
यांचे कडून
आपल्या विशेषांकास मनःपूर्क **शुभकामना !**

**अजय ॲग्रो इंजिनियरिंग, घाटंजी**
**संचालक :** अजय पालतेवार, माजी अध्यक्ष, अम. विद्यापीठ विद्यार्थी संघ, माजी उपाध्यक्ष, न.प.घाटंजी.
**पालतेवार कृषी केंद्र, घाटंजी**
संचालक : संजय पालतेवार
यांचे कडून या विशेषांकाला हार्दिक **शुभेच्छा !**

▪**श्री.तुकाराम रामचंद्र हर्षे** (सोन्या चांदीचे व्यापारी) ▪**निलेश ऑईल इंडस्ट्रीज**▪**हर्षे कृषी केंद्र** ▪**अंकुश ट्रेडर्स**
**संचालक :** सदाशिव हर्षे, कृषी उ.बा. समिती सदस्य शि.प्र.मं.सदस्य प्रकाश हर्षे आणि नामदेव हर्षे, मेन रोड, घाटंजी (जि.यवतमाळ)
नागरी पाणी पुरवठा योजना, घाटंजी विशेषांकास **हार्दिक शुभेच्छा**

# सामाजिक जागरुकता, लोकप्रतिनिधींची सदनातील कृतिशीलता आणि स्थानिक प्रतिनिधींची दक्षता यातून त्या त्या विकास क्षेत्रातील एक एक प्रकल्प असाच पूर्णत्वास गेल्यास अनुशेष दूर व्हावयास वेळ लागू नये !

पुरेशा दाबाने तेथे पाणी मिळत नव्हते. माहीती मिळवितांना असेही लक्षात आले की, या टंचाईवर मात करण्यासाठी **२० मार्च १९९२ च्या शासन निर्णयाने "घाटंजी पूरक पाणी पुरवठा" योजनेला प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. योजनेची किंमत १९ लाख रुपये होती.**

५. आणखी माहिती घेतली असता असे लक्षात आले की, १९ लाख रुपये किंमतीच्या या योजनेला २० मार्च १९९२ लाच प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असली तरी १९९२, १९९३ या दोनही वर्षात या योजनेवर कोणताही विशेष खर्च करण्यात आला नव्हता. **किंबहुना मार्च १९९४ पर्यंत या योजनेवर केवळ साडे तीन लक्ष रुपये एवढाच खर्च करण्यात आलेला होता.** अशा स्थितीमध्ये घाटंजी शहरासाठीच्या या वाढीव पाणी पुरवठा योजनेचा सभागृहात पाठपुरावा करावा असे आम्ही ठरविले.

६. मंगळवार, दिनांक २६ जुलै १९९४ रोजी "घाटंजी शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना" या विषयावरील सर्वश्री.बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, व्ही.यु.डायगव्हाणे यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ३८७०८ हा उत्तरासाठी होता "२० मार्च १९९२ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकिय मान्यताप्राप्त अंदाजे १९ लक्ष रुपये किमतीच्या घाटंजी वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या बांधकामाची सद्यःस्थिती काय आहे?" या प्रश्नाला मा. नगरविकास मंत्री श्री. अरुण गुजराथी यांनी "या योजनेमध्ये ३ लक्ष लिटर क्षमतेची पाण्याची टाकी, वितरण व्यवस्था, पंप व रायझींग मेन या कामांचा समावेश असून **पाण्याच्या**

## *घाटंजी सुधारित पाणी पुरवठा योजना जिल्हा यवतमाळ, प्रशासकीय मान्यता व शासकीय अनुदानाची मंजुरी.*

**महाराष्ट्र शासन : नगरविकास विभाग : निर्णय क्रमांक पापुयो-१०९०/१३८४/सीआर-१५२/९०/नवि-३०**

**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० मार्च १९९२**

*संदर्भ :- महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःस्सारण मंडळाचे पत्र क्र. डब्ल्युएसएस- १०८८/२७६/सीआर६७/पीबीयु-४, दिनांक ३१.७.९०*

**निर्णय :-** घाटंजी शहर वाघाडी नदीच्या उजव्या किनाऱ्यावर वसले आहे. आणि नवीन वस्ती नदीच्या डाव्या किनाऱ्यावर वसली आहे. पुष्कळशी नवीन शासकीय कार्यालये ह्या नवीन घाटी नावाच्या भागामध्ये उघडण्यात आली आहेत. त्यामुळे पाण्याचा फारच तुटवडा भासत आहे. त्यासाठी रु. १९,००,४००/- निव्वळ भाववाढीची रक्कम वगळून (१७.५ टक्के आस्थापना व संयत्रे खर्चासह व इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रके व नकाशे यांना प्रशासकीय मान्यता परिच्छेद ३ मधील अटीच्या आधीन राहून देण्यात येत आहे.

**२.** त्याप्रमाणे ह्या योजनेस १०० टक्के म्हणजेच रु. १९,००,४००/- इतके शासकीय अनुदान देण्यात येत आहे.

**३.** आता मंजूर केलेले अनुदान रोख द्यावयाचे नसून योजनेच्या कामाची जशी प्रगती होत जाईल त्याप्रमाणे योजनेच्या प्रत्यक्ष झालेल्या खर्चावर समायोजित करावयाचे आहे. त्यामुळे मंडळाला उपयोजना प्रमाणपत्र दाखल करण्याची आवश्यकता नाही. ह्या योजनेला खालील अटींच्या आधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ) ही योजना १९९२-९३ च्या मंडळाच्या वार्षिक कृती कार्यक्रमामध्ये अंतर्भूत करणे आवश्यक आहे.

ब) योजना स्वयंसंतुलीत होण्यासाठी नगरपरिषदेने पाणी पट्टीत जरूर ती वाढ केली पाहिजे. त्याप्रमाणे या योजनेवर होणारा खर्च व मिळणारे उत्पन्न याचा हिशोब स्वतंत्रपणे ठेवावा.

क) घाटंजी नगरपरिषदेने आर्थिक परिस्थिती सुधारण्याबाबत नगरपरिषदेच्या सर्व साधारण सभेच्या दि. २१.१०.८९ च्या ठराव क्र. ३ प्रमाणे कार्यवाही केल्याबाबत शासनाचे समाधान करावे.

ड) ही योजना पूर्ण झाल्यानंतर ती राबविण्यासाठी शासनाकडून कोणतेही आर्थिक सहाय्य मिळणार नाही.

इ) मंजूर केलेल्या आर्थिक आकृतीबंधात बदल झाल्यास तो या योजनेस लागू होईल.

**४.** घाटंजी नगरपरिषद ही 'क' वर्गीय नगरपरिषद आहे. ही योजना नगरपरिषदेची मालकीची योजना असून महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळातर्फे राबविण्यात येईल. या योजनेचा वित्तीय आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे.

१) योजनेची निव्वळ किंमत - रु. १९,००,४००/- भाववाढीची रक्कम वगळून (१७.५ टक्के आस्थापना व संयत्रे खर्चासह)

२) शासकीय अनुदान १०० टक्के - रु. १९,००,४००/-

**५.** घाटंजी नगरपरिषद वाढीव पाणी पुरवठा योजनेचा खर्च लेखाशीर्ष मागणी क्र. एफ ५, "२२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता - ०१ - पाणी पुरवठा राज्य योजना (४१) नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व जलनिस्सारण योजनेसाठी सहाय्यक अनुदाने (२) दांडेकर समितीच्या शिफारसीनुसार त्रुटी भरून काढणे" (२२१५०६९६) या खाली खर्ची घालावा आणि त्या अनुदानातून भागवावा.

**६.** हा शासकीय निर्णय वित्त व नियोजन विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर६६/९२/व्यय-३, दिनांक २८.१.९२ आणि नियोजन विभाग अनौपचारिक संदर्भ दि. २९.१२.९० ला अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(भी.ना.शिंत्रे)**
कार्यासन अधिकारी.


WITH BEST COMPLIMENTS FROM

***DR. BABASAHEB NANDURKAR COLLEGE OF PHYSICAL EDUCATION, YAVATMAL***
**COURSES :** B.P.Ed., B.P.E., M.P.Ed.,M.P.Ed.(Vacational), D.Y.Ed., C.P.Ed.

**FACILITIES**
SWIMMING POOL, HEALTH CENTRE, COURTS, GYMNASIUM, PLAY GROUNDS ETC.

***Dr. Prakash Nandurkar*** Principal
***Bhashkarrao Nandurkar*** President

***BALAJI ELECTRO SMELTERS LTD., PLOT NO. B-18, M.I.D.C., YAVATMAL***
***Manufacturers of*** High carbon Ferro Manganese Los-Phns & Silico Manganese
***Regd. Office***
Shri. Krupa Market Complex, Mahabub Mansion, Malakpet, Hyderabad (A.P.)
**KAPARTHI RAGHUNATH**
Managing Director

# १९९२ मध्ये घाटंजीसाठी १९ लाख रुपये किंमतीच्या 'पूरक पाणी पुरवठा योजनेला' मान्यता मिळाली खरी पण प्रत्यक्षात या योजनेवर ९२ - ९३ या वर्षात कुठलाच खर्च करण्यात आला नव्हता.

**टाकीचे बांधकाम सुरू आहे. रायझींग मेन व वितरण व्यवस्थेकरिता कंत्राट निश्चित करण्यात आलेले असून त्यासाठी लागणाऱ्या पाईप्सची मागणी करण्यात आलेली आहे.** तसेच पंपींग मशिनरीकरिता निविदा मागवावयाच्या आहेत." असे उत्तर दिले होते.

"या योजनेची कोणकोणती उपकामे आतापावेतो पूर्ण करण्यात आलेली आहेत व त्यावर मार्च १९९४ पावेतो एकूण किती खर्च करण्यात आला आहे?" या दुसऱ्या उपप्रश्नाला "३ लक्ष लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाकीचे काम ३० टक्के पूर्ण झाले असून योजनेवर मार्च १९९४ पावेतो रुपये ३.५० लक्ष खर्च झाला आहे," असे उत्तर देण्यात आले होते. "विभागाने केलेल्या नियोजनाप्रमाणे ही योजना केव्हा पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले आहे?" या तिसऱ्या उपप्रश्नाच्या **लेखी उत्तरात नगरविकास मंत्र्यांनी असे नमूद केले होते की "ही योजना, डिसेंबर १९९५ पर्यंत पूर्ण करण्याचे अपेक्षित आहे."**

७. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या १९९४ च्या दुसऱ्या अधिवेशनामध्ये मंगळवार, दिनांक २६ जुलै १९९४ रोजी ही जी प्रश्नोत्तरे झाली त्यामुळे दोन गोष्टी स्पष्टपणे पुढे आल्या **एक असे की** २० मार्च १९९२ ला १९ लक्ष रुपये किंमतीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असली तरी मार्च १९९४ पावेतोच्या दोन वर्षामध्ये फक्त साडेतीन लाख रुपयेच या योजनेवर खर्च झालेले होते. "ही योजना, डिसेंबर १९९५ पर्यंत पूर्ण करण्याचे अपेक्षित आहे." असे स्पष्ट आश्वासन या अधिवेशनात मिळाले ही **दुसरी महत्त्वाची उपलब्धी** म्हणता येईल.

८. घाटंजी शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना या विषयावरील सर्वश्री.व्ही. यु. डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ५ हा सोमवार, दिनांक २७ मार्च १९९५ रोजी उत्तरासाठी होता व तो प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये चौथ्याच क्रमांकावर असल्यामुळे तो चर्चेसाठी येण्याची शक्यता

*घाटंजी नागरी पाणी पुरवठा योजना*

## *क. प्रगतीपथावरील योजना*

१. योजनेचे नाव : घाटंजी सुधारित पाणी पुरवठा योजना

२. प्रशासकीय मान्यता : महा. शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. पापुयो/१०९०/१३८४/सीआर/१५२/९० दि. २०.३.९२

३. तांत्रिक मान्यता : अधिक्षक अभियंता, परिसर अभियांत्रिकी मंडळ अकोला यांचे पत्र क्र. ७५ दि. १९.६.९२.

४. योजनेची किंमत : रु. १६.१७ लक्ष निव्वळ रु. १९.०० लक्ष ढोबळ

५. आर्थिक विवरण : शासकीय अनुदान १०० टक्के.

६. संकल्पित लोकसंख्या : २४००० (२००६)

७. योजनेचे स्वरूप :

शहरातील उंच भागाला पुरेशा प्रमाणात व पुरेशा दाबाने पाणी मिळण्याच्या दृष्टीने व शहराची या भागाची होणारी वाढ लक्षात घेऊन सदर योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेचा मूळ उद्भव व जलशुद्धीकरण केंद्राची क्षमता पुरेशी असल्यामुळे यामध्ये काहीही बदल करण्यात आलेला नाही.

८. योजनेचा उद्भव : मूळ उद्भवाप्रमाणे (वाघाडी नदी)

९. दरडोई पाणी पुरवठा : ७० लि.

१०. लोकवर्गणी : लोकवर्गणी लागू नाही.

११. अ. योजनेचे काम सुरू केल्याचा दिनांक : ११/९३

ब. योजना कार्यान्वीतचा दिनांक :

१२. खर्च : १७.६१ लाख ५/९५ पर्यंत

१३. योजनेतील समाविष्ट कामे : खाली दर्शविल्याप्रमाणे तांत्रिक बदल करून

***अ.नं. : समाविष्ट कामांचा तपशील : स्थिती (मंजूर प्रस्तावाप्रमाणे)***

१. शुद्ध पाण्याची साठवण टाकी (आर.सी.सी.संप) ८०००० लि. क्षमता -

२. शुद्ध पाणी पंपीग मशनरी. अ) घाटंजी शहराकरिता १० अश्वशक्तीचे सेंट्रीफ्यु-गल पंप ५५००० मी. दाब. ब) घाटी- ५ अश्वशक्तीचे सेंट्रीफ्युगल पंप २७००० लि. प्रति तास क्षमता असलेले २२ मि. दाब -

३. शुद्ध पाणी उर्ध्वनलिका. १५० मी.मी. व्यासाचे ए.सी. क्लास १५,१९२० मी. लांब -

४. पाण्याची उंच टाकी ३ लक्ष लि. क्षमता घाटी भागाकरिता -

५. वितरण व्यवस्था ८० मी.मी. ते १५० मी.मी. व्यासाची ए.सी. वर्ग १० चार सार्वजनिक नळासहित. -

६. किरकोळ कामे.

*उपरोक्त प्रस्तावित उपांगामध्ये कार्यकारी अभियंता यांनी तांत्रिक बदल सुचवला आहे. तांत्रिक बदलाप्रमाणे करावयाची कामे.* -

१. अशुद्ध पाणी पंपीग मशनरी १५ अश्वशक्ती व्हर्टीकल टर्बाइन पंप्स, १००००० लि. /प्रति तास क्षमता असलेले २० मी. दाब असलेले २ पंप - कामे पूर्ण

२. अस्तित्वात असलेल्या जलशुद्धीकरण केंद्रात आवश्यक बदल - आवश्यक बदल करून.

३. शुद्ध पाणी पंपींग मशनरी २० अश्वशक्तीचे १००००० लि. तास क्षमता असलेले ३२ मी. दाबाचे पंप - कामे पूर्ण.

४. फिडर मेन २०० मी.मी. व्यासाची ए.सी.वर्ग १० ९३५ मी. लांब अस्तित्वात असलेल्या जुन्या टाकीपासून नवीन टाकीपर्यंत - कामे पूर्ण

५. पाण्याची उंच टाकी ३ लक्ष लि. क्षमता असलेली उंची १२ मी. - बॉटम डोमपर्यंत कामे पूर्ण

६. वितरण व्यवस्था मंजूर योजनेप्रमाणे - कामे सुरू.

७ किरकोळ कामे

(as on 3.5.95)

**आमच्या जिल्ह्यातील घाटंजी शहराच्या पाणी पुरवठा समस्येची उकल करणाऱ्या आपल्या विशेषांकाला हार्दिक शुभेच्छा**

**यवतमाळ जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पत संस्था म., यवतमाळ**

(गोधनी रोड, यवतमाळ, र.नं. १०९ सभासद संख्या ८३६०)

नागोराव देवकते, अध्यक्ष बी.एन.जोगी, उपाध्यक्ष

वसंत तिवाडे, सचिव

**संचालक मंडळ**

एस.के. माकोडे, पी.एस.अक्कलवार, रा.बा.कठाळे, बी.एन.चव्हान, पी.जे.नाकतोडे, मो.गौसुद्दीन, जी.एच.फटिंग, पी.के. भोंग, ह.सा. होरे, शं.वि.जिरकर, आर.एल.हजारे, आर.यु.नन्नावरे, श्रीमती सुलोचना वानखेडे, श्रीमती भारती ठोकळे.

पुरुषोत्तम काकडे
व्यवस्थापक

कल्याण निधी, कर्जाची व्यवस्था, प्राविण्यप्राप्त विद्यार्थ्यांना पारितोषिके

**यवतमाळ जिल्हा शालेय कर्मचारी सहकारी पत संस्था म., यवतमाळ**

(गटलेवार बिल्डिंग, पेशवे प्लॉट, यवतमाळ र.न. १४७)

***अध्यक्ष*** :एस.एन.डाबरे, ***उपाध्यक्ष*** : बी.डी.माने, ***सचिव*** : यु.पी.इंगोले, ***सहसचिव*** : सौ.एस.एस.कलोरे, ***कोषाध्यक्ष*** : के.व्ही.नगराळे, ***व्यवस्थापक*** : बी.डब्ल्यु. मनवर

**संचालक गण** : डी.एस.वोबडे, डी.एन.पाटील, डी.जी.दोंदल, डी.एस.आंबटकर, डी.आर.पेचे, सौ.पी.यु.नंदनवार

**श्री.समर्थ विद्यालय, घाटंजी तर्फे**

या विशेषांकाला **हार्दिक शुभेच्छा !**

गो.गं.कोमावार — अध्यक्ष
सु.शं. बल्लाळ — मुख्याध्यापक
कृ.ह.तायडे — व्यवस्थापक

# मार्च, ९४ पर्यंत घाटंजीच्या पाणी पुरवठा योजनेवर फक्त ३.५० लाख इतकी कमी राशी खर्च झाल्याचा निर्वाळा; मात्र डिसेंबर,९५ पर्यंत ही योजना पूर्ण करण्याचे आश्वासन

*- विधान परिषदेच्या १९९४ च्या दुसऱ्या अधिवेशनातील ही महत्वाची उपलब्धी !*

होती व तसा तो चर्चेसाठी आलाही. आता शासन बदलले होते. युती शासनाचे मुख्यमंत्री श्री मनोहर जोशी यांचेकडेच नगरविकास खाते सुद्धा होते. "२० मार्च १९९२ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकिय मान्यताप्राप्त अंदाजे १९ लक्ष रुपये किमतीच्या घाटंजी वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या कामाचा भाग असलेल्या राईझींग मेन व वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण करण्यासाठी कंत्राटदाराला किती मुदत देण्यात आलेली आहे," या लेखी प्रश्नाला मा. मुख्यमंत्री श्री. मनोहर जोशी यांनी "**करारनाम्याप्रमाणे ३०.९.९४ पर्यंत काम पूर्ण करण्यासाठी मुदत देण्यात आली होती. दिलेल्या मुदतीत काम पूर्ण होऊ न शकल्यामुळे या कामासाठी दि. ३०.६.१९९५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.**" असे उत्तर दिले होते.

"मार्च १९९४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षापावेतो या योजनेवर एकूण किती खर्च करण्यात आला व त्यानंतर या आर्थिक वर्षात आतापावेतो (जानेवारी १९९५ अखेर) किती खर्च झालेला आहे," या प्रश्न भाग २ च्या लेखी उत्तरामध्ये असे नमूद करण्यात आले होते की, "मार्च, १९९४ अखेर एकूण झालेला खर्च (ढोबळ) रु. ३.५० लक्ष, १ एप्रिल, ९४ ते जाने ९५ पर्यंत झालेला खर्च रु. २.८५ लक्ष, एकूण ६.८५ लक्ष." **प्रश्न भाग ३ च्या लेखी उत्तरामध्ये हे काम डिसेंबर १९९५ पर्यंत पूर्ण करण्याचे भौतिक व आर्थिक नियोजन नमूद करण्यात आले होते.**

९. अनुपुरक प्रश्नोत्तराला सुरुवात करतांना राईझिंग मेन व वितरण व्यवस्थेचे "काम दिलेल्या मुदतीत का पूर्ण होवू शकले नाही?" असा पहिलाच पूरक प्रश्न प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारला असता मा. मुख्यमंत्री श्री मनोहर जोशी यांनी असे उत्तर दिले की, "अध्यक्ष महाराज, हे काम मुदतीत पूर्ण होवू शकले नाही त्यासंबंधी खात्यामार्फत चौकशी केल्यानंतर असे निदर्शनास आले आहे की हे काम

*प्रेषक : **प्रा.बी.टी.देशमुख** विधानपरिषद सदस्य,*
*३, सुबोध कॉलनी,*
*विदर्भ महाविद्यालयाजवळ, अमरावती-४४४ ६०४.*

**NO. C:\WIN\SAI-2.PM5/LC-642**
**DATE : 13.10.1995**

प्रति,
श्री.शाम रा. बेलोरकर
अध्यक्ष,
नगर परिषद, घाटंजी.

**विषय :-** नगर परिषद घाटंजी सुधारित पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पाण्याचे टाकीचे बांधकाम अत्यंत मंदगतीने होत असल्याबाबत.
**संदर्भ :-** अध्यक्ष, नगरपरिषद घाटंजी यांनी मा.कार्यकारी अभियंता, परिसर अभियांत्रिकी मंडळ, बांधकाम विभाग यवतमाळ यांना दिलेले पत्र क्र. जा.क्र.६०६ दिनांकित २९.९.१९९५.

मा.महोदय

१. संदर्भामध्ये नमूद केलेल्या पत्राची मला अग्रेषित केलेली प्रत मिळाली. ज्याज्यावेळी मी घाटंजी शहराला भेट दिली त्यात्या वेळी घाटी परिसरातील पाणी टंचाईचा मी स्वतः अनुभव घेतलेला आहे. त्यामुळे मी या प्रश्नाचा चांगल्या रीतीने पाठपुरावा करीत आहे/करण्याचे ठरविले आहे.

२. "घाटंजी शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना" या विषयावरील आमच्या तारांकित प्रश्न क्रमांक ३८७०८ ला उत्तर देतांना मा. नगरविकास मंत्री यांनी "ही योजना डिसेंबर १९९५ पर्यंत पूर्ण करण्याचे अपेक्षित आहे". असे स्पष्ट उत्तर दिले होते.

३. २७ मार्च १९९५ रोजी याच प्रश्नावरील तारांकित प्रश्न क्रमांक ५ ला उत्तर देतांना झालेल्या अनुपुरक चर्चेमध्ये "तेव्हा १२ लाख ६५ हजार रुपये डिसेंबर ९५ अखेर खर्च होऊन हे काम पूर्ण केले पाहिजे अशा प्रकारच्या सक्त सूचना इम्प्लिमेन्टीग अथॉरिटीला दिल्या जातील काय? " या उपप्रश्नाला मा. मुख्यमंत्र्यांनी स्वतः "अशा प्रकारच्या सूचना अधिकाऱ्यांना स्पष्टपणे दिलेल्या आहेत." असे उत्तर दिले होते.

४. विधानपरिषद आश्वासन समितीने आपल्या दिनांक ३ मे, १९९५ रोजी झालेल्या बैठकीत मुद्दे निश्चित केले होते. व त्यावर ५ ऑक्टोबर १९९५ रोजी सचिव नगरविकास यांची साक्ष झाली, या साक्षीच्या वेळी "बॉटम डोम ३१ मे ९५ पर्यंत व उर्वरित काम ३१ ऑक्टोबर १९९५ पर्यंत पूर्ण होईल." असे सचिवांनी समितीला सांगितले.

५. एकंदर स्थिती पहाता डिसेंबर १९९५ पर्यंत हे काम निश्चितपणे पूर्ण होईल असे मला वाटते मी त्या दृष्टीने सभागृहाच्या पातळीवर व्यवस्थित पाठपुरावा करण्याचे ठरविले आहे. क्षेत्रीय स्थितीवर आपण लक्ष ठेवून आहात. डिसेंबर १९९५ पर्यंत काम पूर्ण होत नाही असे आपणास वाटल्यास नागपूर अधिवेशन सुरू होण्यापूर्वी ४ डिसेंबर ९५ च्या दरम्यान मला कृपया कळवावे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी माझी जी चर्चा झाली त्यावरून मला अशी खात्री वाटते की हे काम ठरलेल्या वेळी पूर्ण होईल.

आपला विश्वासू

**(बी.टी.देशमुख)**
विधानपरिषद सदस्य

पत्राची प्रतीलिपी माहितीसाठी व आवश्यक कारवाईसाठी मा. कार्यकारी अभियंता परिसर अभियांत्रिकी मंडळ बांधकाम विभाग यवतमाळ यांना समादराने अग्रेषित.

**With best compliments from**
**RIGHT CORPORATE SERVICES LIMITED**
Reliance Building, 5th Floor, 269, D.N.Road, Fort, Bombay-400 001.
**Regd Off. :** Reliance Building, 5th Floor, 269, D.N.Road, Fort, Bombay-400 001.
Phone No.: 2664485 Fax : 022-2659908.
**Corp. Off :** Kamal Prabha, Dhantoli, Nagpur - 440 012.
Phone No. 523319, 521937, 535801 Fax : 0712-528127 Tix : 715-7279 SSIL-IN
***SEBI Approved Merchant Bankers & Brokers***
***All Financial Services Under One Roof.***

# जानेवारी, ९५ पर्यंत योजनेवर केवळ ६.८५ लाख रुपये खर्च झाल्याची कबुली, मात्र उरलेले १२.६५ लाख रुपये खर्च करून डिसेंबर,९५ पर्यंत योजना पूर्ण करण्याचे स्पष्ट आश्वासन.

*विधान परिषदेच्या १९९५ च्या पहिल्या अधिवेशनातील फलश्रृती*

पूर्ण न होण्यासाठी त्या ठिकाणचे जे अधिकारी होते त्या अधिकाऱ्यांनी निष्काळजीपणा दाखविला होता. त्यामुळे या अधिकाऱ्यांच्याविरुद्ध योग्य ती कारवाई करावी अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या आहेत."

अधिकाऱ्यांविरुद्ध विलंबामुळे कारवाई होणे ही वेगळी बाब होती. निश्चित मुदतीत काम पूर्ण होण्याच्या दृष्टीने ठोस आश्वासन मिळविण्याच्या हेतूने प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचारलेल्या "या कामाकरिता आतापर्यंत जवळ जवळ ६ लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत आणि डिसेंबर १९९५ अखेर या कामावर १२ लाख रुपये खर्च होणार आहेत. **तेव्हा डिसेंबर अखेर पर्यंत या कामावर पैसे खर्च होवून ते काम पूर्ण केले जाईल यासंबंधीची सक्त ताकीद इम्प्लीमेन्टींग ॲथारिटीला देण्यात येईल काय?**" या उपप्रश्नाला उत्तर देतांना मा. मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की, "अध्यक्ष महाराज, या कामाच्या बाबतीत दिरंगाई झालेली आहे. या बाबतीत चौकशी करीत असतांना असे आढळून आले की या कामाची प्रथम जी डिझाईन करण्यात आली होती ती डिझाईन नंतर काम सुरू झाल्यानंतर बदलण्यात आली त्यामुळे ही अडचण निर्माण झाली होती. **आता अंतिम स्वरूपाचे डिझाईन असल्यामुळे अशा प्रकारची कोणतीही अडचण निर्माण होणार नाही.** शासन देखील नवीन आलेले आहे आणि या शासनाची कामे करण्याची पद्धत चांगली असल्यामुळे हे काम निश्चितपणे पूर्ण केले जाईल."

मूळ प्रश्नाला लेखी उत्तरामध्ये डिसेंबर १९९५ पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन जरूर नमूद करण्यात आले होते पण डिसेंबर १९९५ पर्यंत काम पूर्ण करण्याचे निश्चित आश्वासन लेखी उत्तरात दिसून येत नव्हते. पहिला पूरक प्रश्न अधिकाऱ्यावरील कारवाईवर खर्ची पडला व दुसऱ्या पूरक प्रश्नाच्या उत्तरामध्ये सुद्धा असे आश्वासन निश्चित शब्दात मिळू शकले नाही. तशातच विलंब झाल्यामुळे वाढलेली किंमत अधिकाऱ्यांकडून वसूल करणार काय? असा उपप्रश्न श्रीराम तोलाणी यांनी विचारला असता "अशा प्रकारची पद्धत नाही" असे

*प्रेषक : श्री.शाम रा. बेलोरकर, अध्यक्ष, नगर परिषद,*
घाटंजी जि. यवतमाळ
***फोन नं. (निवास) ७१०६ (ऑफिस) ७१७४***
दिनांक ८ नोव्हेंबर १९९५ जा.क्र. ६८१/९५

प्रति,
सन्मा. प्रा.बी.टी.देशमुख
विधानपरिषद सदस्य,
३, सुबोध कॉलनी, विदर्भ महाविद्यालयाजवळ,
अमरावती-४४४ ६०४.

**विषय** : नगरपरिषद घाटंजी येथील सुधारित पाणीपुरवठा पूर्ण होण्याचे दृष्टीने केलेल्या प्रयत्नाबद्दल आभार.

**संदर्भ** : आपले पत्र दिनांक १३.१०.१९९५.

महोदय,

आपण मला पाठविलेले दिनांक १३.१०.१९९५ चे पत्र प्राप्त झाले.

वाढीव पाणीपुरवठा योजना पूर्ण होणे ही बाब नगर वासियांचे दृष्टीने जिव्हाळ्याची व अत्यंत ज्वलंत प्रश्न आहे. सदर प्रश्न सोडविण्याचे दृष्टीने आपण केलेला सतत पाठपुरावा व जाणीवपूर्वक प्रयत्न याबद्दल मी आपला मनःपुर्वक आभारी आहे. यापुढेही आपणाकडून वेळोवेळी सहकार्य मिळेल, अशी आशा व्यक्त करतो. आपण केलेल्या सहकार्याबद्दल मी पुनश्च आभारी आहोत.

स्नेहांकित
**(शाम बेलोरकर)**

## घाटंजी शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना

*महाराष्ट्र विधान परिषद : दुसरे अधिवेशन १९९४*
*मंगळवार, दिनांक २६ जुलै १९९४*

३८७०८ **सर्वश्री.बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, व्ही.यु.डायगव्हाणे** : सन्माननीय नगरविकास मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

१. २० मार्च १९९२ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकिय मान्यताप्राप्त अंदाजे १९ लक्ष रुपये किमतीच्या घाटंजी वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या बांधकामाची सद्यःस्थिती काय आहे?

२. या योजनेची कोणकोणती उपकामे आतापावेतो पूर्ण करण्यात आलेली आहेत व त्यावर मार्च १९९४ पावेतो एकूण किती खर्च करण्यात आला आहे?

३. विभागाने केलेल्या नियोजनाप्रमाणे ही योजना केव्हा पूर्ण करण्याचे ठरविण्यात आले आहे?

**श्री. अरुण गुजराथी** : (१) या योजनेमध्ये ३ लक्ष लिटर क्षमतेची पाण्याची टाकी, वितरण व्यवस्था पंप व रायझींग मेन या कामांचा समावेश असून पाण्याच्या टाकीचे बांधकाम सुरू आहे. रायझींग मेन व वितरण व्यवस्थेकरिता कंत्राट निश्चित करण्यात आलेले असून त्यासाठी लागणाऱ्या पाईप्सची मागणी करण्यात आलेली आहे. तसेच पंपींग मशिनरीकरिता निविदा मागवावयाच्या आहेत.

(२) ३ लक्ष लिटर क्षमतेच्या पाण्याच्या टाकीचे काम ३० टक्के पूर्ण झाले असून योजनेवर मार्च १९९४ पावेतो रुपये ३.५० लक्ष खर्च झाला आहे,

(३) **ही योजना, डिसेंबर १९९५ पर्यंत पूर्ण करण्याचे अपेक्षित आहे.**

*.शेतकऱ्यांच्या शेतातील ताज्या व उत्तम दर्जाच्या सोयाबीन पासून निर्मित . नैसर्गिक जीवनसत्व युक्त . माईक्रो रिफाईंड,*
*ट्रिपल फिल्टर्ड व एगमार्क प्रमाणित आणि . रक्तातील कोलेस्टेरॉल नियंत्रित ठेवणाऱ्या..*
*वसुंधरा या सर्वाधिक खपाच्या सोयाबीन खाद्य तेलाची निर्मिती करणाऱ्या*
***शेतकरी सॉल्व्हन्ट (इंडिया) लिमिटेड***
***४०१, कमलप्रभा, धंतोली, नागपूर***

# सभागृहातील पाठपुराव्यामुळे एखादी योजना प्रगतीपथावर असताना स्थानिक प्रतिनिधींनी कामाच्या प्रत्यक्ष प्रगतीवर लक्ष ठेवून असणे अत्यंत आवश्यक असते.

उत्तर मा. मुख्यमंत्र्यांनी दिले. उत्तरातील विसंगतीवर श्री. मधुकरराव किम्मतकर यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना मा. मुख्यमंत्र्यांनी “या दोन्ही उत्तरामध्ये कोणत्याही प्रकारची विसंगती नाही.” असे नमूद केले.

या प्रश्नावरील चर्चेच्या शेवटी कार्यपुर्तीचे निश्चित आश्वासन मिळविण्याच्या हेतूने प्रा.बी.टी.देशमुख यांनी पुन्हा असा प्रश्न विचारला की “मी पुन्हा प्रश्न विचारू इच्छितो की, **डिसेंबर १९९५ पर्यंत काम पूर्ण करण्यासाठी भौतिक आणि आर्थिक नियोजन करण्यात आलेले आहे, तेव्हा १२ लाख ६५ हजार रुपये डिसेंबर ९५ अखेर खर्च होऊन हे काम पूर्ण केले पाहिजे अशा प्रकारच्या सक्त सूचना इम्प्लीमेंन्टीग ॲथारिटीला दिल्या जातील काय?**” त्यावर मा. मुख्यमंत्र्यांनी “**अशा प्रकारच्या सूचना अधिकाऱ्यांना स्पष्टपणे दिलेल्या आहेत.**” असे स्पष्ट आश्वासन दिले.

**१०.** या प्रकल्पाची तड लागण्याच्या दृष्टीने दिनांक २७ मार्च १९९५ रोजी झालेली चर्चा खूपच उपयुक्त ठरली. **एक म्हणजे** जानेवारी १९९५ पर्यंत ६.८५ लाख रुपये या योजनेवर खर्च झाल्याची माहिती मिळाली **दुसरे म्हणजे** १२.६५ लाख रुपये खर्च करून डिसेंबर १९९५ पावेतो काम पूर्ण करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना स्पष्टपणे दिलेल्या आहेत ही महत्त्वाची माहिती सभागृहाला कळली. सभागृहाला मिळालेली आश्वासने ही निश्चित स्वरूपाची, काटेकोर व मुदतबंद होती. विधानमंडळाचे १९९५ चे अंदाजपत्रकी (उन्हाळी) अधिवेशन संपल्यानंतर आश्वासनांची अम्मलबजावणी कशी काय सुरू आहे या उत्सुकतेपोटी प्रत्यक्ष प्रकल्पशहरी भेट देवून बांधकामाधीन उपांगाच्या प्रगतीची माहीती घेतली. या भेटीच्या वेळी स्वतः नगराध्यक्ष श्री.शाम बेलोरकर, प्रा.के.एम.वाघ, श्री.मिलींद चिमोटे व पाणीपुरवठा व जलनिःस्सारण मंडळाचे यवतमाळ येथील कार्यकारी अभियंता श्री.गोखले हे उपस्थित होते. सर्व उपांगांची कामे अपेक्षित वेगाने प्रगती पथावर आहेत असे आम्हाला वाटले.

**११.** एखाद्या योजनेचे काम सुरू होतांना किंवा प्रगतीपथावर असतांना विधानमंडळातील प्रतिनिधींनी जागरूक असणे जेवढे आवश्यक असते तेवढेच स्थानिक प्रतिनिधींनीसुद्धा कामाच्या प्रत्यक्ष प्रगतीवर लक्ष ठेवून असणे अत्यंत आवश्यक असते त्या दृष्टीने सुद्धा ही योजना खुपच नशीबवान ठरली. सप्टेंबर १९९५ च्या दरम्यान घाटी भागामध्ये चालू असलेले पाण्याच्या टाकीचे काम काही कारणामुळे रेंगाळत आहे असे वाटल्याबरोबर घाटंजीचे नगराध्यक्ष श्री शाम बेलोरकर यांनी कार्यकारी अभियंता परिसर अभियांत्रिकी मंडळ, यवतमाळ यांना दिनांक २९ सप्टेंबर १९९५ रोजी एक पत्र लिहून याबाबतची तक्रार नोंदविली. या पत्राची प्रत त्यांनी मलाही पाठविलेली होती.

**१२.** नगराध्यक्ष श्री.शाम बोलोरकर यांच्या २९ सप्टेबर १९९५ च्या पत्राला मी १३ ऑक्टोबर १९९५ रोजी उत्तर पाठवून त्यांना असे कळविले की “एकंदर स्थिती पहाता डिसेंबर १९९५ पर्यंत हे काम निश्चितपणे पूर्ण होईल असे मला वाटते. मी त्या दृष्टीने सभागृहाच्या पातळीवर व्यवस्थित पाठपुरावा करण्याचे ठरविले आहे. क्षेत्रीय स्थितीवर आपण लक्ष ठेवून आहात. डिसेंबर १९९५ पर्यंत काम पूर्ण होत नाही असे आपणास वाटल्यास नागपूर अधिवेशन सुरू होण्यापूर्वी ४ डिसेंबर ९५ च्या दरम्यान मला कृपया कळवावे. क्षेत्रीय अधिकाऱ्यांशी माझी जी चर्चा झाली त्यावरून मला अशी खात्री वाटते की हे काम ठरलेल्या वेळी पूर्ण होईल.” मी माझ्या या पत्राची प्रतीलिपी माहितीसाठी व आवश्यक कारवाईसाठी मा. कार्यकारी अभियंता परिसर अभियांत्रिकी मंडळ, बांधकाम विभाग, यवतमाळ यांनाही अग्रेषित केली होती.

---

## [illegible]

१. “सर्व नगरपालिका शहरामधील पाणीपुरवठा किमान मानदंडाच्या (भारत सरकारने ठरविलेल्या) पातळी एवढा करण्यासाठी जो अधिक पाणीपुरवठा लागतो तो जिल्ह्याचा (नागरी पाणी पुरवठ्याचा) अनुशेष मानावा असे आम्ही सुचवितो” - *सत्यशोधन समितीच्या अहवालामधील परिच्छेद १२.१६*

२. सत्यशोधन समितीच्या अहवालाच्या तक्ता १२.७ मध्ये विभाग निहाय व जिल्हा निहाय मार्च ८२ च्या स्तरावरील अनुशेष नमूद केलेला आहे.

३. “अनुशेष” दशलक्ष लिटर्स दरदिवशीचा दर्शविला आहे. तो दूर करण्याची किंमत सत्यशोधन समितीने आपल्या अहवालामध्ये “एक दशलक्ष लिटर्स दरदिवशी” साठी ४० लाख रुपये या हिशेबाने धरली होती *(अहवालाचा परिच्छेद १२.१६ पहा)* व सत्यशोधन समितीने नमूद केलेली किंमतच खाली दर्शविलेली आहे. सत्यशोधन समितीने निश्चित केलेला रूपयातील अनुशेष १९८२-८३ च्या किमतीवर आधारलेल्या मापदंडानुसार निश्चित केलेला होता परंतु त्यानंतर या खर्चाच्या मापदंडामध्ये फार बदल झालेला आहे. अनुशेष दूर करण्यासाठीच्या किमतीचे हे मापदंड आता कालबाह्य झाले आहेत हे नमूद करावे लागेल.

| अ.नं. | विभाग/जिल्हा | अनुशेष *द.ल.लि.द.* | अनुशेष दूर करण्याचा *खर्च लाखात* |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | अमरावती | ६१.०० | (२४४०.००) |
| २. | अकोला | ५६.५० | (२२६०.००) |
| ३. | बुलढाणा | ३१.२५ | (१२५०.००) |
| ४. | यवतमाळ | २६.०० | (१०४०.००) |
| ५. | भंडारा | २६.०० | (१०४०.००) |
| ६. | चंद्रपूर | २५.७२ | (१०२८.८०) |
| ७. | नागपूर | २४.९२ | (९९६.८०) |
| ८. | वर्धा | २१.८१ | (८७२.४०) |
| ९. | विदर्भ | २७३.२० | (१०,९२८.००) |

---


## *यवतमाळ जिल्हा कंत्राटदार (कल्याण) संघटना, बी.ॲड.सी.कंपाऊंड, यवतमाळ (महाराष्ट्र)*

[illegible] !!

**मुकुंदराव औदार्य** — *अध्यक्ष*

**राजाभाऊ येरावार** — *कोषाध्यक्ष*

**विजय कोटेचा** — *सचिव*

# घाटंजी शहरासाठी १९८६ ते ९२ या ६ वर्षात उन्हाळ्याला तोंड देता देता शासनाला ५ तातडीच्या, योजनांवर ८ ते १० लाख रुपये खर्च करावे लागले ही विदारक वस्तुस्थिती !

नगराध्यक्ष श्री शाम बेलोरकर यांनी माझ्या पत्राला दिनांक ८ नोव्हेंबर १९९५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या उत्तरामध्ये "सदर प्रश्न सोडविण्याचे दृष्टीने आपण केलेला सतत पाठपुरावा व जाणीवपूर्वक प्रयत्न याबद्दल मी आपला मनःपुर्वक आभारी आहे." असे कळविले आहे.

**१३.** पाण्याच्या टाकीचे काम पूर्ण न होण्याबाबत घाटंजीच्या नगराध्यक्षांनी सप्टेबर १९९५ च्या दरम्यान केलेल्या तक्रारीवरून यवतमाळ जिल्ह्यातील वेगाव तालुका मारेगाव येथील पाण्याच्या टाकीच्या बांधकामाचे प्रकरण आठवले. तीन चार हजार लोकसंख्येच्या या गावासाठीच्या पाणीपुरवठा योजनेला १ नोव्हेंबर १९८८ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली. योजनेच्या कामाला जानेवारी १९८९ मध्ये सुरुवात झाली. योजनेची पुरवठा विहीर, पाणबुडे पंप, उर्ध्व वाहिनी व गावाच्या काही भागातील वितरण व्यवस्था ही कामेही पूर्ण झालेली आहेत, पण या योजनेचा भाग असलेल्या पाण्याच्या टाकीचे लहानसे काम मात्र गेल्या सात आठ वर्षात पूर्ण होवू शकलेले नाही. मारेगाव तालुक्याचे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे कार्यवाह श्री.जी.एन. राजुरकर यांनी व या गावच्या नागरिकांनी नोव्हेंबर १९९५ मध्ये याबाबतच्या तक्रारीची निवेदने यथोचित पद्धतीने पाठवून " या पाण्याच्या टाकीच्या न झालेल्या कामाकडे" संबधित मंत्र्यांचे लक्ष वेधले आहे. या तक्रार निवेदनाच्या प्रति त्यांनी पालकमंत्री, आमदार श्री. वामनराव कासावार, श्री.व्हि.यु.डायगव्हाणे, आमदार श्री. पुरके, व माझ्याकडे सुद्धा पाठविल्या आहेत. आम्ही सर्वच लोकप्रतिनिधींनी बांधकाम न झालेल्या या पाण्याच्या वेगाव टाकीचे प्रकरण गंभीरपणे घेतले असून सभागृहाच्या पातळीवर त्याचा उत्तम पाठपुरावा करण्याचे ठरविले आहे. **कोणत्याही कारणाने एखादे काम रेंगाळले तर ते किती रेंगाळू शकते याचे शेजारीच उपलब्ध असलेले उदाहरण नमूद करणे एवढ्यापुरताच हेतू घाटंजीच्या कथेमध्ये वेगावची आडकथा सांगण्यामागे आहे.**

## वेगाव (ता. मारेगाव जि. यवतमाळ) येथील पिण्याच्या पाण्याच्या टाकीचे काम

**महाराष्ट्र विधान परिषद : : पहिले अधिवेशन १९९६**
**मंगळवार, दिनांक १९ मार्च १९९६**

**(१७) ७६१८ सर्वश्री. बी.टी.देशमुख, व्ही. यु. डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील :** सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१. वेगाव (ता.मारेगाव जिल्हा यवतमाळ) या गावाच्या पाणी पुरवठा योजनेचा भाग असलेली जलनिस्सारण मंडळातर्फे बांधण्यात येणारी पाण्याची टाकी १० वर्षापासून अपूर्णावस्थेत आहे ती त्वरीत पूर्ण करण्याबाबतची मागणी उक्त गावच्या ग्रामस्थांनी दिनांक ४ डिसेंबर १९९५ रोजी सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य पाणी पुरवठा मंडळ याना व मा. ग्राम- विकास मंत्री यांचेकडे वेगवेगळी निवेदने पाठवून केली हे खरे आहे काय?

२. असल्यास मे १९९५ मध्ये कामाला सुरूवात केल्यानंतर टाकीच्या कामासाठी खोदकाम करतांना मोठे दगड लागल्याने व कंत्राटदाराला ब्लास्टींग युनिट उपलब्ध न होवू शकल्यामुळे हे काम बंद पडले हेहि खरे आहे काय?

३. असल्यास आलेल्या अडचणींच्या निवारणार्थ शासनाने काय कारवाई केलेली आहे वा करण्याचे योजीले आहे ?

४. अद्यापही कारवाई केलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अण्णा डांगे :** (१) होय.

(२) नाही. तथापि, मोठे दगड फोडण्यासाठी कुशल कामगार कंत्राटदारास न मिळाल्यामुळे खोदकाम मे १९९५ पासून अर्धवट राहिले, हे खरे आहे.

(३) सदर काम त्या ठिकाणावर जाऊन सुरू करण्याकरिता रस्त्याचे काम पूर्ण झालेले असून मोठे दगड फोडण्यासाठी कंत्राटदाराकडे कुशल कामगार उपलब्ध झालेले आहेत. त्यामुळे हे काम पूर्ण करण्यास अडचणी राहिलेल्या नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

एखाद्या शहराच्या नागरी पाणी पुरवठ्याच्या अनुशेषाचे मोजमाप कसे करावे ? तो अनुशेष किती आहे हे कसे ठरवावे ? याचे मापदंड सत्यशोधन समितीने ठरवून दिलेले आहेत. राष्ट्रीय पातळीवर निश्चित झालेल्या प्रमाणकानुसार सार्वजनिक यंत्रणेच्या माध्यमातून एखाद्या शहराला दररोजी उपलब्ध व्हावयाचा **अपेक्षित पाणी पुरवठा व प्रत्यक्ष पाणीपुरवठा यातील फरक म्हणजे त्या शहराचा अनुशेष होय.** प्रत्यक्ष पाणीपुरवठा हा अपेक्षित पाणीपुरवठ्यापेक्षा जास्त असेल अशा शहराला या विकास क्षेत्रामध्ये बिगर अनुशेष शहर असे म्हणता येईल. **प्रत्यक्ष पाणीपुरवठा हा अपेक्षित पुरवठ्यापेक्षा कमी असेल तर ते शहर नागरी पाणी पुरवठ्याच्या विकास क्षेत्रामधील अनुशेष शहर होय.** घाटंजी या शहराला दरदिवशी १५ लक्ष लिटर्स पाणी प्रमाणभूत दरापेक्षा कमी मिळत होते हे सत्यशोधन समितीच्या (दांडेकर) आकडेवारीवरून स्पष्ट होते. अनुशेष निर्मिती व अनुशेष निर्मुलनाची सैध्दांतिक चर्चा करीत असतांनाच अनुशेष निर्मुलनास मदत करणारा त्या त्या विकासक्षेत्रातील एक एक प्रकल्प पुर्णत्वास गेला तरच शेवटी हा अनुशेष दुर होवू शकेल. ही पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्यामुळे एका महत्वाच्या विकासक्षेत्रातील लहानसा अनुशेष दुर होत आहे ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

आपल्या नशिबी आलेल्या या अनुशेषाच्या कंबरेवर लाथ घालण्याचा प्रयत्न अशा कमनशिबी वर्गात समाविष्ट असलेले सर्वच लोक व लोकप्रतिनिधी आपापल्या शक्तिनुसार करीत असतात हे प्रयत्न सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेरहि सतत चालु असतात, असले पाहिजेत. घाटंजी शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेबाबतचा विधानपरिषदेतील अल्पसा प्रयत्न वर नमुद केला आहे.

***- प्रा.बी.टी.देशमुख,***
*विधानपरिषद सदस्य.*


आपल्या मुखपत्राने, भूमिपुत्रांच्या भल्यासाठी, विदर्भपातळीवरील असह्य ... जलसिंचन अनुशेषाचा खरपूस समाचार घेऊन सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले त्याबद्दल आणि आता आपल्या संघटनेच्या या ... "घाटंजी पाणी पुरवठा योजनेचा विधानपरिषद स्तरावरील संघर्षाचा परिचय करून देणाऱ्या विशेषांकाच्या प्रकाशनाबद्दल"... या परिसरातील शेतकरी बांधवांच्या आर्थिक प्रगतीसाठी सदैव कार्यशील असलेल्या ...

**कृषी उत्पन्न बाजार समिती, घाटंजी कडून**
***हार्दिक शुभेच्छा***

विठ्ठलराव लालसरे (अध्यक्ष) कृष्णराव ठाकरे (उपाध्यक्ष) यशवंत भोंग (सचिव)
आणि समस्त संचालक गण

**शिक्षण प्रसारक मंडळ घाटंजी. *हार्दिक शुभेच्छा.***
शि.प्र.मं.माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शि.प्र.मं.कन्या शाळा, शि.प्र.मं. विज्ञान व गिलानी कला, वाणिज्य महाविद्यालय, शि.प्र.मं. मागासवर्गीय वसतिगृह या संस्थांचे संचालन करणारे मंडळ ...

**पी.आर.रूंगटा** (अध्यक्ष) **एम.ए.गिलानी** (उपाध्यक्ष) **एम.आर.रूंगटा** (सचिव) समस्त संचालक मंडळ

**लिलाकमल कन्स्ट्रक्शन्स,**
विदर्भ हाऊसिंग सोसायटी, (गोधनी रोड) यवतमाळ
**वॉटर सप्लाय कॉन्ट्रॅक्टर विरेद्र सावलकर**
यांचे कडून घाटंजी शहराच्या वाढीव पाणी पुरवठा विशेषांकाला
***हार्दिक शुभकामना.***

## घाटंजी शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना

**महाराष्ट्र विधान परिषद : : पहिले अधिवेशन १९९५**
**सोमवार, दिनांक २७ मार्च १९९५**

५. **सर्वश्री.व्ही. यु. डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील** : तारांकित प्रश्न क्रमांक ३८७०८ ला दिनांक २६ जुलै १९९४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय नगरविकास मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

१. २० मार्च १९९२ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकिय मान्यताप्राप्त अंदाजे १९ लक्ष रुपये किमतीच्या घाटंजी वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या कामाचा भाग असलेल्या राईझींग मेन व वितरण व्यवस्थेचे काम पूर्ण करण्यासाठी कंत्राटदाराला किती मुदत देण्यात आलेली आहे,

२. मार्च १९९४ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षापावेतो या योजनेवर एकूण किती खर्च करण्यात आला व त्यानंतर या आर्थिक वर्षात आतापावेतो (जानेवारी १९९५ अखेर) किती खर्च झालेला आहे,

३. डिसेंबर १९९५ पर्यंत हे काम पूर्ण करण्यासाठी प्रत्येक उपकामाच्या पुर्तीचे जे भौतीक व आर्थिक नियोजन विभागाने केलेले आहे त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे?

**श्री. मनोहर जोशी (मुख्यमंत्री)** : (१) करारनाम्याप्रमाणे ३०.९.९४ पर्यंत काम पूर्ण करण्यासाठी मुदत देण्यात आली होती. दिलेल्या मुदतीत काम पूर्ण होऊ न शकल्यामुळे या कामासाठी दि. ३०.६.१९९५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(२) मार्च, १९९४ अखेर एकूण झालेला खर्च (ढोबळ) रु. ३.५० लक्ष, १ एप्रिल, ९४ ते जाने ९५ पर्यंत झालेला खर्च रु. २.८५ लक्ष, एकूण ६.८५ लक्ष.

(३) **वर्ष** - १९९४-९५ **भौतिक नियोजन-** फिडरमेन पाण्याची उंच टाकी, वितरण व्यवस्था. **आर्थिक नियोजन** रु. ५.०० लाख. **वर्ष-** १९९५-९६, **भौतिक नियोजन** - शुद्ध व अशुद्ध पाण्याचे पंप बसविणे तसेच उर्वरित किरकोळ कामे, **आर्थिक नियोजन** - रु. ७.६५ लाख. एकूण रु. १२.६५ लाख.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "करारनाम्याप्रमाणे ३०.९.१९९४ पर्यंत काम पूर्ण करण्यासाठी मुदत देण्यात आली होती. दिलेल्या मुदतीत काम पूर्ण होऊ न शकल्यामुळे या कामासाठी दिनांक ३०.६.१९९५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे." याबाबतीत मला असे विचारावयाचे आहे की, दिलेल्या मुदतीमध्ये हे काम पूर्ण का होवू शकले नाही?

**श्री.मनोहर जोशी** : अध्यक्ष महाराज, हे काम मुदतीत पूर्ण होवू शकले नाही त्यासंबंधी खात्यामार्फत चौकशी केल्यानंतर असे निदर्शनास आले आहे की हे काम पूर्ण न होण्यासाठी त्या ठिकाणचे जे अधिकारी होते त्या अधिकाऱ्यांनी निष्काळजीपणा दाखविला होता. त्यामुळे या अधिकाऱ्यांच्या विरुद्ध योग्य ती कारवाई करावी अशा प्रकारच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, ही दिरंगाई करण्यात जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे आताच माननीय मुख्यमंत्र्यांनी येथे सांगितलेले आहे. आता माझा प्रश्न असा आहे की, टंचाई भासणाऱ्या गावातील हे काम आहे "**डिसेंबर १९९५ पर्यंत हे काम पूर्ण केले जाईल**" अशा प्रकारे या कामाचे नियोजन करण्यात आल्याचे उत्तरामध्ये म्हटलेले आहे. या कामाकरिता आतापर्यंत जवळ जवळ ६ लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत आणि डिसेंबर १९९५ अखेर या कामावर १२ लाख रुपये खर्च होणार आहेत. **तेव्हा डिसेंबर अखेर पर्यंत या कामावर पैसे खर्च होवून ते काम पूर्ण केले जाईल यासंबंधीची सक्त ताकीद इम्प्लीमेन्टींग ॲथारिटीला देण्यात येईल काय?**

**श्री.मनोहर जोशी** : अध्यक्ष महाराज, या कामाच्या बाबतीत दिरंगाई झालेली आहे या बाबतीत चौकशी करीत असतांना असे आढळून आले की या कामाची प्रथम जी डिझाईन करण्यात आली होती ती डिझाईन नंतर काम सुरू झाल्यानंतर बदलण्यात आली त्यामुळे ही अडचण निर्माण झाली होती. **आता अंतिम स्वरूपाचे डिझाईन असल्यामुळे अशा प्रकारची कोणतीही अडचण निर्माण होणार नाही.** शासन देखील नवीन आलेले आहे आणि या शासनाची कामे करण्याची पद्धत चांगली असल्यामुळे हे काम निश्चितपणे पूर्ण केले जाईल.

**श्रीराम तोलानी** : अध्यक्ष महाराज, या कामास दिरंगाई झाल्यामुळे आता या कामाची कॉस्ट वाढणार आहे तेव्हा ही वाढीव कॉस्ट अधिकाऱ्यांच्या पगारातून वसूल करण्यात येणार आहे काय?

**श्री. मनोहर जोशी** : अध्यक्ष महाराज, अशा प्रकारची पद्धत नाही.

**श्री.मधुकर किंमतकर** : अध्यक्ष महाराज, हे काम पूर्ण करण्याकरता ३०.६.९५ पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली आहे तेव्हा या विसंगतीच्या बाबतीत सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा करावा.

**श्री.मनोहर जोशी** : अध्यक्ष महाराज, या ठिकाणी मला कोणत्याही प्रकारची विसंगती दिसून येत नाही. या कामासाठी अगोदर ३०.९.१९९४ पर्यंत मुदतवाढ दिली होती परंतु त्या मुदतीत हे काम पूर्ण न होवू शकल्यामुळे वाढीव मुदत वाढ देण्यात आलेली आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारची विसंगती दिसून येत नाही. या योजनेवर आतापर्यंत जो काही खर्च करण्यात आलेला आहे तो उत्तरामध्ये नमूद करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर हा खर्च कोणत्या बाबीवर करण्यात आला याची माहिती तिसऱ्या उत्तरामध्ये देण्यात आलेला आहे. तेव्हा या दोन्ही उत्तरामध्ये कोणत्याही प्रकारची विसंगती नाही.

**श्री.बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, या कामावर जो खर्च करण्यात आलेला आहे त्याची माहिती तिसऱ्या उत्तरामध्ये देण्यात आलेली नाही. पुढील नियोजनानुसार किती खर्च करण्यात येणार आहे त्याची माहिती तिसऱ्या उत्तरामध्ये देण्यात आलेली आहे. ६ लाख ३५ हजार रुपये या योजनेवर खर्च करण्यात आलेला आहे मी पुन्हा प्रश्न विचारू इच्छितो की, **डिसेंबर १९९५ पर्यंत काम पूर्ण करण्यासाठी भौतिक आणि आर्थिक नियोजन करण्यात आलेले आहे तेव्हा १२ लाख ६५ हजार रुपये डिसेंबर ९५ अखेर खर्च होऊन हे काम पूर्ण केले पाहिजे अशा प्रकारच्या सक्त सूचना इम्प्लीमेन्टीग ॲथारिटीला दिल्या जातील काय?**

**श्री. मनोहर जोशी : अशा प्रकारच्या सूचना अधिकाऱ्यांना स्पष्टपणे दिलेल्या आहेत.**


गंगा फर्टिलायझर्स (प्रा.) लि., दत्त चौक, यवतमाळ

[illegible]

*शेती उत्पादनात अभुतपूर्व क्रांती घडवून आणणाऱ्या कल्पक व सुप्रसिध्द बेलोरकर उद्योग समुहाच्या*

या आधुनिक खत प्रकल्पाकडून, घाटंजी परिसराशी असलेल्या ऋणानुबंधाचे प्रतीक म्हणून, या शहराच्या जनजीवनाशी ज्वलंतपणे निगडित असलेल्या पाणी पुरवठा अनुशेषाचा परामर्ष घेणाऱ्या आणि वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या विधान परिषदेतील पाठपुराव्याचा मागोवा घेणाऱ्या आपल्या विशेषांकास मनःपूर्वक शुभकामना !

**विजय बेलोरकर**
प्रबंध संचालक

कृषिराज मिश्र खते वापरा — भरघोस पिके प्राप्त करा

**WITH THE BEST COMPLIMENTS FROM**

**VILAS CHALLAWAR**
*GOVERNMENT CONTRACTOR*

GEDAMNAGAR
**YAVATMAL**

## वणी येथील वाढीव पाणीपुरवठा योजना व भुयारी गटार योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन-१९९३**

**गुरुवार, १८ मार्च १९९३**

(७) २५७६२ **सर्वश्री. पी.जी.दस्तुरकर, बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, सुरेश पाटील, टी.एफ.पवार** सन्माननीय नगरविकास मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

१. वणी नगराची भुयारी गटार योजना व ५४ लाख रुपये किमतीची वाढीव पाणी पुरवठा योजना यांच्या बांधकामाची सद्यःस्थिती काय आहे;

२. दिनांक २८ सप्टेबर १९९२ रोजी मंत्रालयामध्ये मा.उप-मंत्री नगरविकास यांच्या दालनामध्ये नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांशी उक्त विषयावर आयोजित करण्यात आलेल्या चर्चेमध्ये याबाबत काही निर्णय घेण्यात आले, हे खरे आहे काय;

३. असल्यास, ते निर्णय कोणते व या निर्णयाच्या अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय?

**श्री.अरुण गुजराथी :** (१) वणी नगराची अस्तित्वात असलेली भुयारी गटार योजना नगरपरिषद, वणीने ताब्यात न घेतल्यामुळे व नगरपरिषदेने घरगुती गटाराची जोडणी भुयारी गटार योजनेशी न केल्याने ही योजना कार्यान्वित झाली नाही व दिनांक १२ ऑगस्ट १९८२ पासून बंद स्थितीत आहे. सदर योजना दुरुस्त करून कार्यान्वित करण्याकरिता योजनेच्या दुरुस्ती अंदाजपत्रकातील तीन भागांपैकी पहिल्या भागाकरिता रु. २४.६० लाख किंमतीची अंदाजपत्रके मंडळाने दिनांक ४ मार्च १९९३ रोजी शासनाकडे सादर केली आहेत. वणी वाढीव पाणीपुरवठा योजनेकरिता अंदाजपत्रके परिसर अभियांत्रिकी मंडळ, अकोला यांचेकडे तयार करण्यात येत आहेत.

(२) होय

(३) निर्णय :-

(अ) भुयारी गटार योजना दुरुस्त करून घरगुती गटारांचे कनेक्शनकरिता निधी नगरपरिषदेने उपलब्ध करून द्यावा, त्याकरिता तीन झोन पाडून एका झोनचे (दाट वस्तीच्या) अंदाजपत्रक तयार करून शासनाकडे सादर करावे.

(ब) १०० कनेक्शन किंमत नगरपरिषदेने भरावी व त्याची जबाबदारी नगरपरिषदेची असेल.

(क) वणी वाढीव पाणीपुरवठा योजनेची अंदाजपत्रके तयार करून शासनाकडे पाठवावी.

अंमलबजावणीची सद्यःस्थिती

(अ) वणी भुयारी गटार योजनेकरिता झोन क्रमांक १ चे दुरुस्ती रु. २४.६० लक्ष किंमतीचे अंदाजपत्रक शासनाकडे प्राप्त झाले आहे. परंतु त्यामध्ये नगरपरिषदेचा योजना स्वीकृतीचा ठराव व नगरपरिषदेची आर्थिक स्थिती अहवाल प्राप्त झालेला नाही.

(ब) नगरपरिषदेने करावयाच्या १०० कनेक्शनकरिता अंदाजपत्रक नगरपरिषदेकडे मंडळाने ४ मार्च १९९३ रोजी पाठविले आहे.

(क) वाढीव पाणीपुरवठा योजनेचे अंदाजपत्रक अकोला मंडळ कार्यालयात तयार करण्यात येत आहे.

## वणी (जि.यवतमाळ) येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन १९९३**

**गुरुवार दिनांक १५ जुलै १९९३**

(११) २८४७६ **सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, टी.एफ.पवार :** तारांकित प्रश्न क्रमांक २५७६२ ला दिनांक १८ मार्च १९९३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय नगरविकास मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील कायः-

१. वणी (जि. यवतमाळ) शहराच्या ५४ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेची अंदाजपत्रके तयार होणे व प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे;

२. प्रशासकीय मान्यता मिळाली असल्यास केव्हा व मिळालेली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अरुण गुजराथी :** (१) वणी वाढीव पाणीपुरवठा योजनेकरिता वितरण व्यवस्थेची सुधारणा व नवीन पाण्याची टाकी, या कामाची अंदाजपत्रके नवीन दरसूचीनुसार महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळामार्फत करण्यात येत आहेत.

(२) योजना शासनास सादर झालेली नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

## वणी (जि.यवतमाळ) येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन १९९३**

***सोमवार दिनांक १३ डिसेंबर १९९३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी, २७ डिसेंबर १९९३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली***

(१७) ३१०७१ **सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, टी.एफ.पवार :** तारांकित प्रश्न क्रमांक २८४७६ ला दिनांक १५.७. १९९३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय नगरविकास मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील कायः-

(१) वणी (जि.यवतमाळ) शहराच्या ५४ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेची नवीन दरसूची नुसार अंदाजपत्रके तयार होणे व प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे;

(२) प्रशासकीय मान्यता मिळाली असल्यास केंव्हा, व मिळालेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.अरुण गुजराथी :** (१) सदरहू बाबीची महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ व शासनाकडे छाननी चालू आहे.

(२) योजना शासनाकडे आल्यानंतर निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देण्याचा विचार करण्यांत येईल.

## वणी (जि.यवतमाळ) येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन १९९४**

**शुक्रवार दिनांक १८ मार्च १९९४**

(२१) ३४०६८ **सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, टी.एफ.पवार :** दिनांक २७ डिसेंबर १९९३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या १३ डिसेंबर १९९३ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत समाविष्ट असलेल्या तारांकित प्रश्न क्रमांक ३१०७१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय नगरविकास मंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय?

(१) वणी (जि.यवतमाळ) शहराच्या ५४ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेची नवीन दरसूची नुसार अंदाजपत्रके तयार करणे व व प्रशासकीय मान्यता देणे इत्यादी बाबींचे महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःस्सारण मंडळ व शासनाकडे सुरू असलेल्या छाननीचे काम पूर्ण झाले आहे काय?

(२) असल्यास उक्त योजनेला प्रशासकीय मान्यता दिली असल्यास केंव्हा, नसल्यास याबाबत विलंब होण्याची कारणे काय आहेत?

**श्री. अरुण गुजराथी :** (१) नाही

(२) प्रशासकीय मान्यता देणे संदर्भात कार्यवाही सुरू आहे.

WITH BEST COMPLIMENTS FROM
**CENTRAL AGRICULTURAL AGENCIES**
*DATTA CHOWK, YAVATMAL*
DISTRIBUTORS
OF
SEEDS
&
PESTICIDES
**RAJABHAU PALTEWAR**

**शि.प्र.मं.विज्ञान व गिलानी कला, वाणिज्य महाविद्यालय**
*घाटंजी (जि.यवतमाळ) कडून*
घाटंजी शहराच्या पिण्याच्या पाण्याच्या समस्येची दखल घेणाऱ्या नुटा विशेषांकाला **हार्दिक शुभेच्छा!**

| पी.आर.रूंगटा | एम.ए.ए.गिलानी. | एम.आर.रूंगटा | जे.के.श्रीवास्तव |
| --- | --- | --- | --- |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | सचिव | प्राचार्य |

घाटंजी शहराची नागरी पाणी पुरवठ्याची ज्वलंत समस्या सोडविण्यासाठी विधान परिषद पातळीवर झालेल्या प्रयत्नांचे विश्लेषण करणाऱ्या आपल्या विशेषांकास ... स्थानिक पातळीवर या शहराच्या योजनाबद्ध विकासासाठी जाणीवपूर्वक अस्तित्वात आलेल्या **अभियंता मंडळ व सहकारी, घाटंजी** या समाजसेवा प्रतिष्ठान **तर्फे हार्दिक शुभेच्छा!**

# घाटंजी शहरासाठी वाढीव पाणी पुरवठा योजना विशेषांक

## वणी (जि.यवतमाळ) येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन १९९४**

**मंगळवार दिनांक १२ जुलै १९९४**

(२५) ३८३३१ **सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, पी.जी.दस्तुरकर, सुरेश पाटील, नितीन गडकरी, वसंतराव मालधूरे** : तारांकित प्रश्न क्रमांक ३४०६४ ला दिनांक १८ मार्च १९९४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय नगरविकासमंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय?

(१) वणी (जि.यवतमाळ) शहराच्या ५४ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेची नवीन दरसूची नुसार अंदाजपत्रके तयार करणे व व प्रशासकीय मान्यता देणे इत्यादी बाबींसंदर्भात महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःस्सारण मंडळ तसेच शासनाच्या पातळीवर सुरू असलेली कार्यवाही पूर्ण झाली ही गोष्ट खरी आहे काय?

(२) असल्यास उक्त योजनेला प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे काय, दिली असल्यास केव्हा;

(३) नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय?

**श्री.अरुण गुजराथी** : (१) नाही

(२) नाही

(३) प्रस्तावाची छाननी सुरू आहे.

## वणी (जि.यवतमाळ) येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन १९९४**

**गुरुवार, दिनांक २४ नोव्हेंबर १९९४**

(१३) ४०१६१ **सर्वश्री वसंतराव मालधूरे, नितीन गडकरी, अशोक मोडक, पी.जी.दस्तुरकर, बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, सुरेश पाटील, जयवंत ठाकरे** : तारांकित प्रश्न क्रमांक ३८३३१ ला दिनांक १२ जुलै १९९४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय नगरविकासमंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय?

(१) वणी (जि.यवतमाळ) शहराच्या ५४ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेची नवीन दरसूची नुसार अंदाजपत्रके तयार करणे व व प्रशासकीय मान्यता देणे इत्यादी बाबींसंदर्भात महाराष्ट्र पाणीपुरवठा व जलनिःसारण मंडळाच्या प्रस्तावाची शासनाच्या पातळीवर सुरू असलेली छाननीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय?

(२) असल्यास उक्त योजनेला प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे काय, असल्यास केव्हा;

(३) अद्याप प्रशासकीय मान्यता दिलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत व त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे?

**श्री.अरुण गुजराथी** : (१) होय

(२) व (३) लवकरच प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

## वणी (जि.यवतमाळ) येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन १९९५**

**बुधवार दिनांक २ ऑगस्ट १९९५**

***रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी गुरुवार दिनांक ३ ऑगस्ट १९९५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवली प्रश्न क्रमांक (१२) १४२२***

(१२) १४२२ **सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील** : तारांकित प्रश्न क्रमांक ४०१६१ ला दिनांक २४ नोव्हेंबर १९९४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय?

१. वणी (जि.यवतमाळ) शहराच्या अंदाजे ६३ लाख रुपये किंमतीच्या वाढीव पाणी पुरवठा योजनेला प्रशासकिय मान्यता देणारे शासनआदेश २३ नोव्हेंबर १९९४ रोजी निर्गमित करण्यात आले असून ही योजना १९९४-९५ च्या कृती कार्यक्रमामध्ये समाविष्ट करण्याचे निदेश महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळास शासनाने दिले हे खरे आहे काय?

२. खरे असल्यास मंडळाने या योजनेच्या कार्यपुर्तीचे काय नियोजन केलेले आहे,

३. अद्यापहि नियोजन झालेले नसल्यास याबावत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मनोहर जोशी** : (१) नाही. तथापि, योजनेला मंजुरी देतांना योजनेचा समावेश आर्थिक कृती कार्यक्रमात करावा या अटीच्या आधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(२) ही योजना निधीच्या उपलब्धतेनुसार २ वर्षात पूर्ण करावयाचे नियोजन आहे. योजनेत प्रामुख्याने वितरण व्यवस्थेचा समावेश असून त्याकरिता आवश्यक पाईप्स मिळविण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

## वणी (जि.यवतमाळ) येथील वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सद्यःस्थिती

**महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन १९९५**

**गुरुवार दिनांक ९ ऑगस्ट १९९५**

***रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या चौथ्या यादीतील प्रश्न क्रमांक ४२४२६***

(१७) ४२४२६ (३१.१.९५) सर्वश्री **श्री.वसंतराव मालधूरे, श्रीमती संजीवनी रायकर, पी.जी.दस्तुरकर, बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, जयवंत ठाकरे, सुरेश पाटील** : सन्माननीय मुख्यमंत्री पुढील गोष्टीचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (जि.यवतमाळ) शहराच्या वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी वणी नगरपरिषदेच्या योजना स्वीकृतीचा ठराव वणी नगरपरिषदेची आर्थिक स्थिती दर्शविणारा स्थानिक लेखा निधी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय?

(२) असल्यास रु. ६३.१८ लाख किंमतीच्या अंदाजपत्रकास शासनाने मान्यता दिली आहे काय;

(३) असल्यास सदर योजनेच्या कामास प्रारंभ झाला आहे काय व या कामासाठी किती निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे?

**श्री. मनोहर जोशी** : (१) होय

(२) होय दिनांक २३ नोव्हेंबर १९९४ रोजी शासनाने या योजनेस प्रशासकीय मान्यता दिली आहे.

(३) नाही. कारण या योजनेच्या कामास प्रारंभ करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले वितरण व्यवस्थेचे पाईप्स अद्यापि उपलब्ध झालेले नाहीत. १९९५-९६ या आर्थिक वर्षात या कामासाठी एकूण रु. ३१.०० लाख एवढ्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

**NUTA BULLETIN** (Fortnightly Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **PUBLISHER AND ACTING EDITOR :** R. Chittaranjan, Gulmohar Colony, Camp, Amravati-444 602 Composed at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Offset Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. ATI 263 Licenced to post without prepayment **LICENCE NO. ATI 10**
Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **14 - 05- 1996**

**if Undelivered please return to :**
NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan,
Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.